## पुर परिस्थितीत काय कराल?

- विजेवर चालणा-या उपकरणांचा विज पुरवठा तोबडतोब खंडीत करा.
- जर आधी तुम्हाला पुर संदर्भात कल्पना मिळाली असेल किंवा तुम्हांला पुर येईल अशी शंका येत असेल तर तुमच्या घरातील उपयुक्त सामान व महत्वाचे कागदपत्रे इतरत्र सुरक्षीत ठिकाणी हलवा.
- घरातील वहाने, जनावरे काही उपयुक्त साहीत्य उंच ठिकाणी हलवा.
- घरात काही जंतुनाशके असतील तर ती पाण्यात मिसळणार नाही याची दक्षता घ्या, जेणे करुन पाणी प्रदुषीत होणार नाही.
- जर तुम्ही घर सोडणार असाल तर पाणी विज गॅस कनेक्शन बंद करुन जा.
- घर सोडून जातांना घराची दारे,खिडक्या सर्व घट्ट बंद करुन जा.
- पुराच्या पाण्यात जाऊ नका.
- पुर आलेल्या भागात विनाकारण भटकू नका, गर्दी करु नका.

## आगीपासून संरक्षणासाठी :-

- आपल्या घरामध्ये, कामाच्या ठिकाणी अथवा सार्वजनिक ठिकाणी निकासाचे (बाहेर पडण्याचे मार्ग) (**ESCAPE ROUTE**) जाणून घ्यावे व ते नेहमी अडथळे विरहीत ठेवावे.
- गोदामे, घरातील कोठीघर इत्यादी ठिकाणी कचरा तेलकट पदार्थ अथवा जळावू पदार्थ जमा करु नका.
- स्वयंपाक घरामध्ये विशेष काळजी घ्यावी.रात्री गॅस सिलेंडरचा रेग्युलेटर बंद करावा.
- दर सहा महीन्यांनी गॅसनळी बदलावी. स्टोव्ह, मेणबत्ती इत्यादी ज्वालाग्राही वस्तु गॅसपासून दुर ठेवाव्या.
- घरातील जुनी वीजेची उपरणे /जुन्या तुटलेल्या तारा त्वरीत बदलाव्या.
- वीजेच्या उपकरणांचा उपयोग करतांना ॲम्पीयर तपसणी करावी व योग्य सॉकेटमध्ये वापर करावा. अधिभार केल्यास शॉर्टसर्किटमुळे आगीचा संभव असतो.
- घरातील हिटर, गॅस इत्यादी पासून कपडे पडदे,लाकडी वस्तू कमीत कमी तीन फुट लांब ठेवाव्यात.
- काडेपेटया, केरोसीन, अत्तर, इस्त्री इत्यादी लहान मुलांपासून दुर ठेवाव्यात.
- अग्निश्मन नळकांडे (**FIRE EXTINGUISHER**) आपल्या घरामध्ये कामाच्या ठिकाणी शाळा इत्यादी ठिकाणी ठेऊन त्याचा उपयोग कसा करावा याचे प्रशिक्षण व सराव घ्यावा.

## आग लागल्यास :-

- अग्निशमन दलास १०१ क्रमांकावर फोन करावा.
- स्वत:च्या कपडयांना आग लागल्यास जमिनीवर लोळून आग विझविण्याचा प्रयत्न करा, पळू नका.
- आग लागल्या ठिकाणी आपण असल्यास उभे न राहता गुडघ्याच्या मदतीने बाहेरच्या मार्गाकडे सरकावे किंवा जावे.
- तोंडावर ओला रुमाल / कपडा ठेवून धूरापासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा.

## वीज पडणे घरात घ्यावयाची काळजी :-

- वीज व वादळापुर्वी संकणक, दरदर्शन संच इत्यादी विद्युत उपकरणे बंद करुन त्याची पीन (प्लग) भिंतीवरील सॉकेट मधून अलग करुन ठेवावी.
- शक्यतो दुरध्वनीचा वापर टाळावा.

  बाथरुम मध्ये वादळी वातावरणात शॉवर, वीजेच्या (गीझर /हिटर)उपकरणांचा उपयोग टाळावा.

## वीज पडणे घराबाहेर घ्यावयाची काळजी :-

- आकाशात वीज चमल्यानंतर दहा सेकंदानी मेघगर्जनांचा आवाज आल्यास अंदाजे तीन कि.मी.च्या परिसरात वीज पडण्याची शक्यता समजावी.
- झाडाखाली आश्रय घेऊ नका.
- आपले वाहन वीजेचे खांब व झाडे यापासून दूर ठेवून सावकाश चालवावे.
- सायकल अथवा मोटार सायकल या वाहनांचा वापर टाळावा.
- आपण एखाद्या मोकळया परिसरात असल्यास गुडघ्यामध्ये डोके वाकून बसावे. स्वत:ला धातूच्या वस्तू पासून दूर ठेवावे.

## प्राथमिक उपचार :-

- वीज पडल्यास मुख्यत: मानवी ह्दय व श्वसन प्रक्रियेस अडथळा येतो. सबब विद्युत घात झाल्यावर लगेच ह्दय व ह्दयाच्या आसपासच्या भागाची मालीश करावी. तोंडाने श्वसन प्रक्रियेस मदत करावी.